1568
ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय आ.वा
क्र. ७५५८



IRBK-0115747
IRBK-0115747

काप

सौ. मृणालिनी जोशी

ग्रा. वांङ्मय
१५७४८०
७६।१।५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

प्रकाशक :
न. शं. कुलकर्णी
जयन्त आणि कंपनी,
स. नं. ७२० चा २०,
नवी पेठ, पुणें ३०

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति : सन १९७४

दिनांक : १८ डिसेंबर १९७४
चंपाषष्ठी, शके १८९६

मुद्रक :
न. शं. कुलकर्णी
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
स. नं. ७२०चा २०,
नवी पेठ, पुणें ३०

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र ३५८४० नों दि १६।१।८५
वि. बा. बा.

# प्रकाशकाचा हेतु

भारतीय संस्कृति ही उज्वल आहे. संस्कृतीचा आविष्कार हा उत्तमोत्तम गुणांच्याद्वारें होत असतो. असे गुण दाखविणारे साहित्य प्रकाशित करणें, हाच आमचा मुख्य हेतु. ह्या कयेंत परमेश्वराचा प्रसाद समजून प्रिय वा अप्रिय तसेंच सुख वा दुःख ह्यांचें ग्रहण करण्याची तयारी शर्याति राजाची सुकन्या कां दाखवितें तें ही कथा वाचा म्हणजे तुम्हांस कळेल.

चंपाषष्ठी : शके १८९६
दिनांक : १८-१२-१९७४

— प्रकाशक

# कायापालट कोणाचा ?

सुकन्येचा कीं च्यवन ऋषींचा ?

कथा वाचा म्हणजेच कळेल !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १५८४८ नों. दि. १६।११८५
वि. ...... क्र. ............



# कायापालट

“ सखे सुकन्ये, आता परत फिरू या बाई ! ”

“ इतक्यात ग कशाला ? फारच करतेस घाई ?

अजून सूर्य मावळतीकडे कलला देखील नाही. ”

“ ते खरं ग; पण आपण शिबिरापासून खूप दूर आलो आहोत. सूर्यास्ताच्या आत परत पोचायला हवं. नाहीतर महाराणी चिंता करतील, आपला शोध घ्यायला दासदासींना पिटाळतील आणि मला पाहिल्याबरोबर माझा कान धरून म्हणतील, “ तुझं सगळं शहाणपण चुलीत गेलं की काय आज ? तू समंजस आहेस असं समजून सुकन्येबरोबर पाठवीत होते

मी तुला. पण तूही तशीच ! माझी सुकन्या आहे बनवेडी. वृक्षवेली भेटल्या की तिला आप्तेष्टांची आठवणच उरत नाही. मृगाच्या शावकासारखी रानावनात सैरभैर होऊन खेळत राहते, म्हणून तुला पाठवलं." तीनतीनदा सांगितलं की, "दूर जाऊ नका, झाडावर चढू नका, सरोवरात डुंबू नका, वारुळांना दुखवू नका."

"पुरे बाई, आमच्या आईच्या या सगळ्या आज्ञा मला आता तोंडपाठ झाल्या आहेत. बालपणापासून आई हेच सांगत आलीय् बघ. आपली मुलगी वाढते आहे, मोठी होते आहे, हे तिच्या लक्षातच येत नाही."

"नाही हं. हे मात्र खरं नाही सुकन्ये, आपली ही इवलीशी असलेली चंद्रकोर पुनवेच्या चंद्रासारखी प्रफुल्लित झाली आहे, उपवर झाली आहे, हे त्यांनी केव्हाच ओळखलं आहे; म्हणून तर महाराजांच्या मागं लागून त्यांनी देशोदेशी दूत पाठवले आहेत. लौकरच स्वयंवराचा मंडप उभारला जाईल म्हटलं."

"इश्श ! तुझं आपलं काहीतरीच ! कुठलं बोलणं कुठं नेलंस !"

"खोटं आहे का मी म्हटलं ते ?"

"खोटं नाही ग ... पण ... इतक्यात कशाला विचार करायचा त्याचा."

"तुला नाही; पण मला आतापासूनच विचार करायला हवा."

"का ग ?"

" का म्हणजे ? येणाऱ्या राजकुमारांचा परिचय मीच तर करून देणार आहे तुला ! आमच्या पिताजींनी एकेका राजघराण्याची माहिती द्यायला सुरुवातसुद्धा केली परवापासून."

" प्रभेऽ ... ते ... आनंदपूरचे ... "

" कोण ? सांग ना. अशी थांबलीस का मधेच ?" स्वयंप्रभेनं विचारलं; पण सुकन्या बोलताना थांबली. ती पुन्हा बोललीच नाही. तेव्हा तिच्या गळ्यात हात टाकून स्वयंप्रभेनं लडिवाळपणानं विचारलं, "सखे, तुझं मन तर जडलं नाही कुठं ? "

सुकन्येचे गाल लाजेनं लाल-लाल झाले.

स्वयंप्रभा हसली. म्हणाली, " असं आहे होय ? ए, आम्हाला नाव तरी सांग ना... वाटलं तर लिहून दाखव ..."

" चल .... चावट कुठली ! " असं म्हणत सुकन्या उठून उभी राहिली. विषय बदलीत म्हणाली, " या सगळ्याजणी गेल्या कुठं बाई ? परतायला हवं लवकर ? उर्मिलेऽ ... अग ए अलकनंदेऽ ... " प्रभे, बघ तरी कुठं गेल्या आहेत त्या.

" पलीकडे लपंडाव खेळताहेत मघापासून. तू थांब हं, मी आणते त्यांना बोलावून."

सुकन्येला एकान्त हवाच होता. सभोवतालच्या हिरव्यागार सुंदर वनश्रीकडे डोळे भरून पहात ती मनाशीच म्हणाली, " विवाहानंतरचा पहिला वसंतऋतू इथंच घालवायचा .... कारण त्याचं खरं वैभव हेच आहे. नैसर्गिक अकृत्रिम सौंदर्य या रानावनातच दृष्टीला पडतं. हिरव्यागार पानांवर डुलणारी

पिवळीजर्द फुलं... समोरच्या त्या अशोकवृक्षावर शोभणारी लालबुंद झुपकेदार फुलं.पलाशवृक्षाची शेंदरी लांबट आकाराची फुलं... त्याला बिलगलेल्या वेलीवरची निळसर बारीक फुलं.. छे! .... राजमहालापुढच्या उद्यानाला नाही येत ही असली शोभा! तिथलं सौंदर्य आखीव नि रेखीव. नागरी नि कृत्रिम! इथल्यासारखं मन मानेल तसं उधळलेलं सहजसुंदर लावण्य माणसानं निर्माण केलेल्या नगरीत कसं दिसणार? ..."

वृक्षवेलीचं राहू दे... पण हे त्या झाडाखालचं वारुळसुद्धा किती छान दिसतंय. कुणीतरी भव्य पुरुष तपाला बसल्याचा भास होतोय त्याच्याकडे पाहून. मनात आलेल्या या कल्पनेनं सुकन्या स्वत:शीच हसली. उत्सुकतेनं वारुळाजवळ गेली. त्याच्याकडे हर्षभरित होऊन उद्गारली, "अय्या? किती सुंदर रत्न आहेत यात. चमचम करताहेत नुसती? स्वयंप्रभा यायच्या आत ही काढून घ्यावी. अशी चकित होईल पाहिल्यावर प्रश्नावर प्रश्न विचारून भंडावून सोडील; पण मी तिला दाद लागू देणार नाही. तिची चेष्टा करून म्हणेन, आनंदपूरच्या राजकुमारांनी पाठवली आहेत, भेट म्हणून.... कर्णभूषणं करायला..."

मनाशी असे मनोरे रचीत सुकन्येनं जवळच पडलेली एक काठी उचलली आणि नेम धरून ती हिऱ्याला लावली. काठीनं तो हिरा पुढं ओढू लागली; पण काय झालं कोण जाणे! त्याचं लकाकणं एकदम थांबलं.

"जाऊ दे बाई! हा दुसरा तरी हलक्या हातानं काढला पाहिजे."

यावेळी तिनं आणखी एक काटकी घेतली आणि दोन काटक्यांच्या बेचक्यात हिऱ्याला पकडलं; पण-पण हा देखील हिरा एकाएकी दिसेनासा झाला. निराशेनं तिनं काटक्या फेकून दिल्या आणि...

— आणि तिच्या अंगावर सरसरून काटा आला —

कारण, खाली पडलेल्या त्या काटक्यांची टोकं रक्तानं लाल लाल झाली होती !

सुकन्या पुरती गोंधळली. हे आहे तरी काय ? तिनं हातांची पोकळी करून डोळ्यांवर धरली नि दृष्टी एकाग्र करून ती त्या हिऱ्यांच्या जागी पाहू लागली.

पाहते तो तिथून धार लागलेली ! रक्ताचीच ही धार ! घात झाला ! ! कुणावर तरी भयंकर आघात झाला ! ! ! या जाणीवेनं सुकन्येची सुकुमार तनुलता भीतीनं थरथर कापू लागली. तिला दरदरून घाम फुटला. डोळ्यांना अंधारी आली व हातांच्या ओंजळीत तोंड लपवून ती तिथंच मटकन् खाली बसली.

मैत्रिणींना घेऊन परत येणाऱ्या स्वयंप्रभेनं तिला असं हताश होऊन बसलेलं दुरूनच पाहिलं. तेव्हा ती लगबगीनं तिच्याजवळ आली. सुकन्येच्या मुखावरील हात दूर करीत तिनं विचारलं,

" सखे काय झालं ग ? बरं का वाटत नाही तुला—की एखाद्या हिंस्र पशूला पाहून अशी भयभीत झाली आहेस ? "

काही न बोलता सुकन्येनं वारुळाकडे बोट केलं.

" नाग दिसला की काय तुला ? "

सुकन्येनं नकारार्थी मान हलवली.

" मग आहे तरी काय त्या वारुळात ? "

" मी ! मी बसलोय इथं. "

स्वयंप्रभेच्या प्रश्नाचं उत्तर आलं; पण ते सुकन्येच्या तोंडून नव्हे वारुळातून. त्या धीरगंभीर स्पष्ट आवाजानं स्वयंप्रभा दचकली. तिनं विचारलं, " मी ? मी म्हणजे ? "

" मी च्यवन ऋषी. "

स्वयंप्रभेनं सुकन्येकडं पाहिलं. तिचा हात हातात घेऊन तिला स्पर्शानंच धीर देत म्हणाली, " प्रणाम मुनिराज. राजकन्येची सखी आपल्याला वंदन करीत आहे. "

" पण ती राजकन्या कुठं आहे ? " कठोर आवाजात प्रश्न आला.

सुकन्या विलक्षण घाबरली. स्वयंप्रभेला हळूच म्हणाली, " प्रभे, फार मोठी चूक झाली ग माझ्या हातून ! मी रत्नं समजून आत काठी घातली; पण ... पण मला वाटतं ते डोळे असावेत ग या ऋषीचे ! "

" काय सांगत्येस तरी काय हे ? त्यांच्या डोळ्यांना लागलं तर सुकन्ये ? "

" खूप लागलंय. रक्त वहातंय. "

" फार वाईट झालं. "

" हो ग ... पण आता करायचं काय ? शापून दग्ध करणार हा आपल्याला ! "

" थांब– आधीच घाबरून नको जाऊ अशी. " मैत्रिणीला असा धीर देऊन स्वयंप्रभेनं वारुळापुढं हात जोडले व म्हणाली, " ऋषीराज, माझ्या सखीकडून नकळत अपराध घडला. आपल्याला फार दुःख झालं; पण महाराज, आपण तिच्या निष्कपट मनाकडे पाहून तिला क्षमा करावी. आई होऊन थोर मनानं तिची चूक पोटात घालावी.

" क्षमा ? " च्यवन ऋषींनी संतापून म्हटलं, " जिनं मला जन्माचं अंध केलं, त्या राजकन्येला क्षमा ? अशक्य! अशक्य! ! त्रिवार अशक्य ! ! ! "

" आगळीक झाली खरी . . . पण ती अजाणता . . . "

" कशीही होवो, चूक घडली ना हातून ? मग तिचं प्रायश्चित्त घेतलंच पाहिजे. "

" सांगावं मुनिराज– "

" तुला सांगून उपयोग नाही. "

" मग तिलाच सांगावं. "

" पण तिनं घ्यायला हवं. घेईल ? "

" होय. घेशील ना सुकन्ये ? "

" होय. ऋषींनी सांगावं. चुकलं खरं. माझ्यामुळं आपण जन्माचे अंध झालात. मी काय करू म्हणजे आपल्या या दुःखाची अंशतः तरी भरपाई होईल ? "

" मनापासून बोलते आहेस ना ? "

" होय . . . सांगावं. "

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय
वा. क . . . नों. दि . . .

" सांगतो. पण तुझ्याआधी तुझ्या वडिलांना सांगायला हवं. जा, राजा शर्यातीला इथं बोलावून आण. "

" होय महाराज, मी आत्ताच सेवकाला पाठवते. "

* * *

वनविहार करता-करता हे काय अरिष्ट ओढवलं मध्येच. असं म्हणत राजाराणी दोघंही धापा टाकीत तिथं आली आणि अंगावरचं वारुळ झटकून उभे असलेल्या च्यवन ऋषींना राजा शर्यातीनं साष्टांग नमस्कार घातला. त्यांचे पाय धरून तो म्हणाला, " क्षमा असावी मुनिराज ! माझ्या लेकीचा अपराध मायमाउली होऊन पोटात घालावा. तिच्यावरचा राग सोडावा.

" ठीक आहे; पण त्यासाठी तुझ्या मुलीनं माझी अंधत्वाची उणीव दूर केली पाहिजे. "

" ती कशी मुनिवर ? "

" तिनं आमचे डोळे होऊन राहिलं पाहिजे आमची सेवा-शुश्रूषा करून. आयुष्यभर आमची सेवा केली पाहिजे. "

च्यवन ऋषींचं हे सांगणं चमत्कारिक होतं. राजाला त्याच्या म्हणण्याचा अर्थ नीट समजला नाही. तो गोंधळून म्हणाला, " पण...पण माझी कन्या उपवर आहे. लौकरच तिचं स्वयंवर होईल. "

" होय. पण ते तुझ्या राजधानीत होणार नाही. इथेच होईल. सुकन्येची वरमाला च्यवन ऋषींच्या गळ्यात पडेल ! "

" च्यवन ? "

" असा ओरडू नकोस शर्याती. माझी हीच अट आहे, हाच आग्रह आहे की माझं अंध आणि एकाकी आयुष्य सुसह्य होण्यासाठी सुकन्येनं माझ्याशी विवाह केला पाहिजे, जन्मभर माझी सेवा केली पाहिजे."

" पण... पण... "

" नाही. यात थोडासुद्धा बदल घडणार नाही. सत्यच सांगायचं तर तुझी ही रूपवती मुलगी पाहता क्षणीच मला आवडली होती. या मुलींच्या गडबडीनं माझी समाधी भंग पावली, मी डोळे उघडून पाहिलं, तो समोर सुकन्याच दिसली. मी मोहित होऊन तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला; पण अनेक वर्षं मौन असल्यानं मुखातून शब्द बाहेर पडेना. मी तसाच पहात राहिलो, आणि काय घडतंय हे कळण्यापूर्वीच मी हा असा अंध होऊन बसलो. तरीही माझं तिच्यावर प्रेम आहे. राजा, मी तुझ्या मुलीला कधी दुखावणार नाही.

तरीही राजाच्या मनाची सिद्धता होईना. कुठं सुंदर, कोमल यौवनानं बहरलेली सुकन्या अन् कुठं हा जराजर्जर कृशकाय नि अंध च्यवन !

राणीच्या हृदयाचं पाणी-पाणी झालं. आपल्या एकुलत्या एक लाडक्या लेकीला पोटाशी धरून तिनं हंबरडाच फोडला. ती आक्रंदून म्हणाली, " पोरी, पोरी काय झालं ग हे ? "

या साऱ्यात सुकन्या मात्र शांत होती. तिची भीती नाहीशी झाली. तिच्या मनाचा निश्चय झाला होता. अपराध घडला, त्याचं क्षालन करायलाच हवं.

प्रायश्चित्त घ्यायलाच हवं. समोर जे काही येईल त्याचा स्वीकार करायला हवा, परमेश्वराचा प्रसाद समजून प्रिय नि अप्रिय, सुख नि दु:ख दोन्हीचंही ग्रहण करायलाच हवं. आपण नकार दिला तर हा तपस्वी कोपून शाप देईल, अवघ्या राज्याची जाळून राखरांगोळी करील. छे छे ! माझ्या एकटीच्या सुखासाठी मी प्रजेचा नाश होऊ द्यायची नाही. त्यापेक्षा माझी मी एकटीच जळेन. सुखस्वप्नांचा मी होम करीन. मृदुमधुर प्रीतीफुलांच्या कोमल पायघड्या या वैराग्याच्या रुक्ष पायाखाली पसरीन. याच्या सेवेचं कठोर व्रत घेऊन जन्मभर याच्याचसाठी झिजत राहीन !

हा विचार मनात पक्का होताच सुकन्या आईच्या मिठीतून झट्कन् दूर झाली. डोळ्यांच्या खाचा झालेल्या नि अंगावर सुरकुत्यांचं जाळं झालेल्या वृद्ध च्यवन ऋषींकडे पाहात निश्चयी स्वरात म्हणाली, “ महाराज, मी या विवाहाला सिद्ध आहे. ”

“ सुकन्ये, शुद्धीवर आहेस ना तू ? ”

“ होय आई, मी पूर्ण विचार करूनच सांगते आहे. ”

“ अगं पण सखे – ”

“ पण आता उरलाच नाही स्वयंप्रभे ! स्वयंवर इथंच झालं. वर निश्चित केला आहे माझा मीच. मीदेखील नव्हे, माझ्या दैवानं. माझ्या पूर्वकर्मानं ! ”

" बरं झालं एकपरी ... प्रत्येकाची ओळख करून द्यायचा त्रास वाचला बघ तुझा ! "

" सखे, का असं लागट बोलतेस ? तुझ्यासाठी वाट्टेल तो त्रास काढला असता– आनंदाने. पण ...; पण हे बघवत नाही ग–"

" उगी ... उगी प्रभे, डोळे पूस बघू ... हे बघ, माझ्या जागी आता तूच आहेस आईला. माझ्या आईबाबांना माझी आठवण-सुद्धा होऊ देऊ नकोस. "

" तुझी कन्या मोठी विचारी आहे राजा. " इतका वेळ सर्वांचं बोलणं ऐकत असलेले च्यवन ऋषी समाधानानं म्हणाले.

" होय ऋषीवर. फार समंजस आहे, आमची सुकन्या; पण तिचा हा समंजसपणाच तिच्या दुःखाला कारणीभूत होणार आहे. मुनिराज, सारखं वाटतं की, राजप्रासादातल्या वैभवात वाढलेली माझी ही सुकुमार कन्या कंदमुळं भक्षण करून राना-वनात कशी राहील ? नाही. तिला हे जमणार नाही, कधीच मानवणार नाही. काटचाकुटचातून चालताना तिची पदकमलं रक्तबंबाळ होतील. पर्णशय्येवर पहुडतांना तिच्या कुसुमकोमल तनुलतेला क्लेश होतील. "

" ऋषीवर, आपण आमच्यावर दया करा. आपली अट मागं घ्या. मी आपल्याला सुखसोयींनी संपन्न असा सुंदर आश्रम बांधून देतो. सेवेला दासदासी देतो. फार काय सांगू, माझं अर्धं राज्य-सुद्धा देतो; पण माझ्या मुलीला अशी वनवासी करू नका. "

" बाबा, आपण राजे. आपल्याला अशी दयेची भीक मागणं शोभणारं नाही. आपण उदास होऊ नका, कुणापुढं पदरही पसरू

नका; कारण त्याचा उपयोग नाही. सुकन्येचं विधीलिखित अटळ आहे.मी आनंदानं च्यवन ऋषींच्या गळ्यात वरमाला घालायला सिद्ध आहे. आजपासून आपली कन्या च्यवनांची अर्धांगी झाली आहे. त्यांची छाया होऊन जगणार आहे. बाबा, तुम्ही मनाला लावून घेऊ नका. आई, असं डोळ्यांना पाणी आणू नकोस बाई. अग, मला हे असं रानावनात राहायलाच फार आवडतं. होय की नाही ग प्रभे ? ''

पण स्वयंप्रभेनं उत्तर दिलं नाही.दु:खाच्या अनिवार आवेगाने तिच्या मुखातून हुंदका मात्र बाहेर पडला.

अखेरीस उरावर धोंडा ठेवून राजा शर्यातीनं कन्यादान केलं. वरदक्षिणा देऊन च्यवन ऋषींची बोळवण केली.

सुकन्या सासरी निघाली. आईची आसवं पुसून नि स्वयंप्रभेला प्रेमभरानं थोपटून सुकन्येनं राजप्रासादाकडे पाठ फिरवली.

पाठमोऱ्या सुकन्येकडं पहात स्वयंप्रभा विस्मयानं उद्‌गारली, '' एकदम किती बदलली ही ! माझी ही हरीणकाळजाची सखी इतकी कठोर होईल, असं स्वप्नातदेखील वाटत नव्हतं मला ! अजूनसुद्धा मनात येतं, हे असिधाराव्रत पेलेल ना हिला ? ''

* * *

सुकन्येनं मात्र त्याच कठोर निश्चयानं आपल्या व्रताचं आनंदानं पालन केलं. मस्तकावर मंगलाक्षता पडल्या अन् तिचं बालपण संपलं. ती च्यवन ऋषींच्या आश्रमात वावरू लागली. सूर्यनारायणाचा सात घोड्यांचा रथ पूर्वेच्या अंगणात यायच्या आधीच आपल्या नित्याच्या पर्णशय्येवरून सुप्रभाती उठत असे.

कमळाच्या अष्टपाकळ्या उमलण्यापूर्वीच तिचं सडासंमार्जन होत असे. नंतर आश्रमाशेजारच्या प्रवाहात स्नान करून सुकन्या आपला देह लतापल्लवांनी आणि विविध रंगांच्या फुलांनी सुशोभित करी. मनात म्हणे, " माझ्या पतीला माझं रूप दिसत नसलं म्हणून काय झालं, या सुगंधानं तर ते सुखावतील ? "

नंतर पर्णकुटीभोवती लावलेली भाजी खुडून आणून रुचकर, स्वादिष्ट स्वयंपाक ती सिद्ध करी. पतीजवळ बसून त्याला आग्रहानं खाऊ घाली.येणाऱ्या-जाणाऱ्या पांथस्थालाही पतीच्या पंक्तीला बसवून मायेनं जेवायला वाढी.

निष्ठेनं आरंभलेल्या या सेवाव्रतानं सुकन्येच्या ठायी एक अगदी आगळं तेज निर्माण झालं होतं. त्यामुळे तिच्या सौंदर्यावर सात्त्विकतेचा साज चढला होता. तसेच वासनांचा निरास झाला होता नि अंत:करण आनंदानं आकंठ भरून गेलं होतं.

सुकन्या सुखात होती खरी; पण तिच्याशी हट्टानं लग्न करणारे च्यवनऋषी मात्र मनातल्या मनात सतत झुरत होते. आपल्या वृद्धत्वाची आणि अंधत्वाची त्यांना खंत वाटत होती. सुकन्ये-सारख्या सुंदर, सद्‌गुणी नि निरागस मुलीच्या संसारसुखाला वासनेच्या आहारी जाऊन आपण आग लावली, अशी रुखरुख त्यांच्या मनाला सतत जाळीत होती.

त्या दिवशीही त्यांना रात्रभर झोप आली नाही. गाढ झोपलेल्या सुकन्येचा विचार करता-करता त्यांचे डोळे भरून आले. त्यांनी तिच्या भरभरीत केसांवरून आपला थरथरता हात फिरवीत म्हटलं, " परमेश्वरा, या अश्राप जिवाला फार यातना दिल्या मी. कोवळ्या कळीला रखरखीत वाळवंटात

फेकून दिलं. देवा, माझ्यावर दया कर... हिच्यासाठी तरी माझं दुबळेपण दूर कर!"

त्यांच्या स्पर्शानं सुकन्या जागी झाली. पटकन् उठत म्हणाली, "अशी कशी बाई आज झोप लागली मला...आपल्याला उठवावं लागलं ना मला?"

"वाटलं तर झोप अजून–"

"नको बाई...सूर्योदयाच्या आत उरकत नाहीत मग सारी पारोशी कामं."

सुकन्या उठली. पतीच्या चरणांना वंदन करून ती नित्याच्या कामाला लागली. थोडं दिसू लागताच स्नानाला गेली.

"कोण ही रूपयौवना?"

स्नान करता-करता पुरुषाचा आवाज कानावर पडताच सुकन्या दचकली. ओल्या अंगावर तिनं चटकन वस्त्र ओढून घेतलं. तरी तिच्या टवटवीत मुखकमलावर जलबिंदु तसेच शोभत होते. काळ्याभोर विपुल केशसंभारातून जलधारा मोत्यांच्या सरीसारख्या ओघळत होत्या.

"देवी! तुझ्या या सुस्नात रेखीव रूपयौवनाकडे पाहून आम्ही चकित झालो आहोत... तू कोण, कुठली?"

"सुकन्येनं संकोचून म्हटलं, कुणी का असेना, परस्त्रीकडं असं पाहाणं बरं नव्हे..."

"तो दोष असलाच तर आमचा नव्हे, तो आहे तुझ्या सौंदर्याचा! देवी, आम्ही दोघं अश्विनीकुमार आहोत."

" नमस्कार करते मी आपल्याला. आश्रमात माझे पती आहेत. त्यांना आनंद होईल आपल्या भेटीचा. "

" कुणाचा आहे हा आश्रम ? "

" च्यवनऋषींचा. मी त्यांची अर्धांगी. "

" म्हणजे ? त्या म्हाताऱ्याशी संसार करतेस तू ? "

" क्षमा करा अश्विनीकुमार; पण आपण सभ्यतेनं बोलावं. पतिनिंदा ऐकणं सतीला शक्य नसतं, हे मी आपल्याला सांगायला हवं असं नाही ! "

" देवी ! तुझ्या या निष्ठेनं आम्ही अधिकच मोहित झालो आहोत. त्या वृद्धासाठी एवढा जीव टाकतेस तर आमच्यासारख्या तरुण, सुदृढ पुरुषाची संगत मिळाली तर... "

" बस्स झालं ! आणखी एक अक्षरही उच्चारू नका. "

" तुझ्या भल्यासाठी सांगतो आहोत. आमच्यापैकी कुणाही एकाचा तू स्वीकार कर आणि हे रूपयौवन सार्थकी लाव. "

ते ऐकताच सुकन्या रागानं लाल झाली. अश्विनीकुमारांकडे तीक्ष्ण दृष्टीनं पाहात म्हणाली, " माझ्या सार्थकतेची पंचाईत परपुरुषाला हवी कशाला ? आपण रूपवान् असाल, मोठे वैद्यराज असाल, सुदृढ नि तरुणही असाल; पण या सुकन्येच्या लेखी त्याला कवडीचदेखील मोल नाही. आपणच नव्हे, प्रत्यक्ष इंद्रदेव येऊन उभा राहिला, तरी माझी पतिनिष्ठा ढळणार नाही. माझं सतीचं व्रत कधीच भंगणार नाही ! "

" सुकन्ये, तुझ्या या भाषणानं तू आम्हांला अधिकच प्रिय झाली आहेस ! सांग, तुझं आम्ही काय प्रिय करू ? "

"निर्मळ मनानं विचारीत असाल तर सांगते; आपल्या दिव्य विद्येनं माझ्या पतीची दृष्टी परत द्या."

"अवश्य ! दृष्टीच नव्हे, आम्ही त्याचं तारुण्यही परत देऊ- पण ..."

"पण काय ? आपल्याला धनदौलत का हवी आहे ? तसं असेल तर माझा पिता- राजा शर्याती आपली इच्छा तत्काळ पूर्ण करील."

अश्विनीकुमार तिच्या निष्पाप, भोळ्याभाबड्या बोलण्याला मनातल्या मनात हसले. एकमेकांकडे अर्थपूर्ण दृष्टीनं त्यांनी पाहिलं नि म्हणाले, "धनदौलतीचा लोभ आम्हांला नाही सुकन्ये."

" मग आपल्याला हवंय तरी काय ?"

" देशील ? "

"होय."

"मग ऐक तर. च्यवन डोळस आणि तरुण झाल्यावर तू आमच्या तिघांपैकी एकाची पती म्हणून निवड केली पाहिजेस. आहे मान्य ?"

सुकन्या विचारात पडली. काय करावं ? पती डोळस होण्याची संधी आली आहे.आपल्या हातून घडलेल्या अपराधाचं परिमार्जन होणार आहे; पण ... पण हे तिघं सारखेच दिसू लागले तर ? तर नेमकं कसं ओळखायचं आपल्या पतीला ?

"का, बोलत का नाहीस सुकन्ये ? "

"मी माझ्या पतीला विचारून काय ते सांगते. आपण थांबावं."

वटवृक्षाखाली कृष्णाजिनावर बसलेल्या च्यवनऋषींना सुकन्येनं सारी कथा सांगितली. त्यांच्याही मनाला तोच पेच पडला. सुकन्येनं चुकून दुसऱ्यालाच वरलं तर? पण त्यांनी तो विचार दूर सारला. तेवढ्यासाठी यौवन आणि डोळे यांच्या लाभाची ही संधी वाया घालवणं त्यांना योग्य वाटलं नाही. सुकन्येचा हात धरून ते अश्विनीकुमारांकडे गेले. हात जोडून म्हणाले, "वैद्यराज, आम्हांला आपली अट मान्य आहे!"

"ठीक आहे च्यवनमुनी, आपण या प्रवाहात उडी घ्या म्हणजे तुम्हाला नवयौवन प्राप्त होईल."

याच प्रवाहात स्नान करण्याची सवय असल्याने च्यवनऋषींनी प्रवाहात बरोबर उडी मारली.

त्याच वेळी त्यांच्याच बरोबर अश्विनीकुमारांनीही पाण्यात उड्या टाकल्या.

काठावर एकटीच उभी राहिलेली सुकन्या धडधडत्या नेत्रानं प्रवाहाकडे पाहू लागली. देवाचा धावा करीत म्हणू लागली, "देवा! आजवर मनोभावानं पतीची सेवा केली – तिच्या पुण्याईवर मला या सतीत्वाच्या कठिण परीक्षेत यश दे... माझ्या हातून पाप घडू देऊ नकोस!"

बघता-बघता पाण्यातून तीन पुरुष वर आले. अगदी एकसारखे एक! तरुण – सुदृढ – सुंदर...

तिघांचा तोंडावळा सारखा, नेत्रांचा आकार सारखा आणि .. तिघांचे डोळेही खिळले होते एकाच ठिकाणी.

साही भृंगे रुंजी घालीत होते; एकाच कमलमुखा भोवती !

सुकन्या तिघांकडे बारकाईनं पाहात राहिली. पतीची ओळख पटते का पाहू लागली.

आणि पाहता-पाहता मधेच खुद्कन् हसली. पटली ! पतीची ओळख पुरती पटली ! !

> हाच आपला पती. कारण याच्या डोळ्यांत स्निग्धता आहे. शांतता आहे. तृप्ती आहे, या दुसऱ्या दोघांच्या डोळ्यांत आहे कामुकता, अभिलाषा, वासना . . .कारण त्यांना मी हवी आहे. माझ्या देहाचा उपभोग हवा आहे. कधी न मिळालेली स्त्री पाहून यांच्या दृष्टी-तून कामवासना ओसंडते आहे; . . . .पण माझ्या पतीचं तसं नाही. त्यांचे डोळे माझ्या-वर आसक्तीनं खिळलेले नाहीत. देहापलीकडे असलेल्या माझ्याकडे ते प्रेमानं, पाहताहेत.

सुकन्या अनेक वर्षांनी अशी मनापासून हसली. नवविवाहित युवतीच्या अधीरतेनं पुढं झाली आणि तिनं आपल्या पतीला मिठी घातली. प्रेमभरानं त्याच्या वक्षस्थलावर मस्तक घुसळीत ती म्हणाली, " ओळखलं ना बरोबर ? "

तिच्या पतीनं तिला हृदयाशी अगदी घट्ट धरलं. प्रीतीनं तिची हनुवटी वर उचलली . . .

"अहो-अहो आम्ही आहोत म्हटलं इथं !" तेवढ्यात हसत-हसत अश्विनीकुमार उद्गारले.

सुकन्या लाजून दूर झाली. तेव्हा च्यवनऋषीही मोठ्यानं खळखळून हसले. अश्विनीकुमारांच्या पाठीवर थोपटीत म्हणाले, "क्षमा करा हं. अद्वैताच्या आनंदात आम्ही विसरून गेलो तुम्हांला ! चला... आता आमच्या पर्णकुटीत चला..."

"खरंच चलावं आपण. आपल्या कृपेनं आज मला माझ्या पतीचं हे सुंदर रूप दिसलं, यांचे प्रेमळ डोळे दृष्टीला पडले. आपण एक प्रकारानं मला हे सौभाग्यचं दानच देत आहांत अश्विनीकुमार ! चलावं आपल्या या गरीब बहिणीच्या हातचे दोन घास खाऊन मग पुढे जावं."

"सुकन्ये, तू बोलावलं नसतंस तरी आम्ही तुझ्या हातचा प्रसाद घेतल्यावाचून पुढं गेलोच नसतो."


"पुढं कुठं जाणार आहात आपण ?"

"का ?"

"नाही, आमच्या राज्याकडे जाणार असाल तर ही सुवार्ता माझ्या आई-बाबांना सांगावी आपण ! किती आनंद होईल त्यांना ! बरं का, त्यांना म्हणावं, तुमच्या सुकन्येनं लगोलग बोलावलंय तुम्हांला. आणि बरोबर स्वयंप्रभेलाही घेऊन या. तिच्या पतीला नि मुलांनाही आणा. फार जीव आहे तिचा माझ्यावर !"

सुकन्या लहान मुलीच्या अधीरपणानं बोलत होती. तिचं अचानक हरवलेलं बालपण अकल्पितपणानं परतून आलं होतं.

तिचा निरागस भाव पाहून च्यवनऋषींना आनंद झाला. तिच्याकडे कौतुकानं पाहात ते अश्विनीकुमारांना म्हणाले, " का हो कुमार, तुम्ही कायापालट केलात तो कुणाचा ? माझा की हिचा ? "



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ९५७४७ नों. दि ९६/९/०५
वि. ........ बा. वा. ........ क्र. ....................
IRBK-0115747
IRBK-0115747